पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२२० /२०२१
दिनांक : ३०/०४/२०२१

प्रति,


मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **दि.०४/०५/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार**, दिनांक **०४/०५/२०२१** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

**दिनांक : ०४/०५/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार,** दिनांक **०४/०५/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) मौजे तळवडे येथील गट क्र. ९ मधील नियोजित अशुद्ध जलउपसा केंद्रासाठी पोहोच रस्ता म्हणून मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याचे जागेचे संपादन करून मिळणेची मागणी पाणीपुरवठा विभागाने केलेली आहे. सदर गट क्र.९ मंजूर विकास योजनेनुसार औद्योगिक वापर विभागामध्ये आहे. तसेच देहूरोड अँम्युनेशन डेपोच्या २००० यार्डाच्या प्रतिबंधित क्षेत्रात (Red zone) आहे. बाजारमुल्यदर तक्त्यातील (सन २०२०-२१) मुल्य विभाग क्र.१८/७ नुसार गट क्र.९ साठी रू.५,५००/- चौ.मी. इतका दर नमुद आहे. तथापि, सदर रस्त्याचे क्षेत्र हे प्रतिबंधित क्षेत्रात असलेने व प्रतिबंधीत क्षेत्रात कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नसल्याने बाजारमुल्यदर तक्त्यातील मार्गदर्शक सूचना मधील अ.क्र.२० (ह) नुसार रू.५,५००/- चौ.मी. दराचे ४०% प्रमाणे येणा-या दराने रस्त्याने बाधित ४२०० चौ.मी. क्षेत्रासाठी रू.१,०२,६७,४००/- मुल्यांकन रक्कमेस मा.आयुक्त यांनी दि.२५/११/२०२० चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. सदरचे मुल्यांकनाबाबत संबंधित जागा मालक यांचेशी पाणीपुरवठा विभागाचे संबंधित प्रतिनिधीसह चर्चा झाली असता त्यांनी मुल्यांकन रक्कम अमान्य असल्याचे सांगितले. तसेच जागेचा मोबदला हा खाजगी वाटाघाटीने (रोख स्वरूपात) महाराष्ट्र शासनाच्या चालू बाजार मुल्य दराने १.३ पट एवढा मिळणेची मागणी केली आहे. " भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम– २०१३ च्या कलम २६ अन्वये " केवळ वार्षिक मुल्य दर तक्त्यातील दरावर आधारित नुकसान भरपाई दिली जात नसून तरतुदीप्रमाणे येणारे मुल्य विचारात घेणेबाबत तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील दि.१२/०५/२०१५ चे शासन निर्णयामध्ये, खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत, मार्गदर्शक तत्वे नमूद आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमीन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४, दि.२०/११/२०१५ व ठराव क्र.९१५, दि.२९/०८/२०१६ नुसार नुकसान भरपाई अदा

करताना ज्या मिळकतधारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. आहे. अशा बाधित छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंडधारकांना ३०% दिलासा रक्कम याप्रमाणे कार्यवाही केली जाते. सदर जागेची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१२/०५/२०१५ रोजीच्या “खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत ” शासन निर्णयानुसार ताब्यात घेणेची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील मोबदला निश्चितीसाठीच्या जिल्हास्तरीय समिती मार्फत करता येणे शक्य आहे. सदरची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२२०/२०२१
दिनांक : ३०/०४/२०२१ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.